**<u>विषय : ऑनलाइन कौशल्य विकास योजना चे माहिती व व्हिडिओ विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वेबपेजद्वारे प्रसिध्द करणेबाबत.</u>**

कोव्हिड १९ कोरोना व्हायरस च्या प्रादुर्भावामुळे आपत्कलिन स्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीमध्ये सर्व विद्यार्थी संभ्रमावस्थेत अडकले आहेत तेव्हा त्यांना मानसिक स्थैर्य देऊन, मनोबल वाढविण्याच्या दृष्टिकोनातून तसेच पुढील आयुष्यात मार्गदर्शनपर असे कौशल्य विकास अर्थात सॉफ्ट स्किल चे ऑनलाईन धडे विद्यार्थी विकास विभागातर्फे व कौशल्य विकास योजनाचे विद्यापीठाचे अधिकृत प्रशिक्षकांद्वारे देण्यात यावे असे मा.कुलगुरु महोदयांनी आदेश दिले आहेत. त्यानुसार दिनांक २१.४.२०२० रोजी ऑनलाईन सभा संपन्न होवून कार्यवृत्तास मा.कुलगुरू महोदयांची मान्यता प्राप्त झालेली आहे. सोबत सभेचे कार्यवृत्त जोडण्यात आलेले आहे.

सदर व्हिडीओ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या कौशल्य विकास योजना तज्ञ प्रशिक्षकांद्वारे योजनेच्या अभ्यासक्रमावर या उपक्रमाअंतर्गत तयार करण्यात आलेले आहे. यामध्ये संवाद तंत्र, मुलाखत तंत्र, गटचर्चा, स्वपरिचय, पत्रलेखन, सादरीकरण तंत्र, वेळेचे व्यवस्थापन, ध्येयनिश्चिती, स्वप्रेरणा, नैतिकता व चारित्र्य इ. कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रमाचा समावेश आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संकेतस्थळवरील Corona Impact: Important Notices & Circulars या Tab मध्ये Online Soft Skill Development Workshop यावर वेबपेजद्वारे प्रसिध्द करण्याकरीता मा.कुलगुरू महोदयांद्वारे मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर बाब आपले माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव सादर.

संचालक, विद्यार्थी विकास

प्रमुख, संगणक केंद्र